# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

*(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)*

## जाहीर प्रकटन

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अधिकार मंडळांकडून, ज्या विद्यार्थ्यांची सत्रपूर्तता (N+2) संपुष्टात आली आहे किंवा कायम नोंदणी क्रमांक (PRN) कालावधी संपुष्टात आला आहे अशा सर्व विद्यार्थ्यांना सध्या सुरू असलेला NON-NEP पॅटर्न अभ्यासक्रम पूर्ण करून परीक्षेस प्रविष्ट होण्यासाठी अधिकचे एक वर्ष (N+2+1) देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच काही अभ्यासक्रमांतील N+2 आणि N+2+1 व्यतिरिक्त अधिकचा सत्रपूर्तता कालावधी असलेल्या विद्यार्थ्यांनाही सध्या सुरू असलेल्या NON-NEP पॅटर्नमध्ये अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षास प्रवेशित/प्रविष्ट होऊन असे NON-NEP अभ्यासक्रम पूर्ण करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्या अनुषंगाने सर्व विद्याशाखा, सर्व अभ्यासक्रमांतील उपरोक्लेखित कालावधी संपुष्टात आलेल्या अशा विद्यार्थ्यांची माहिती (डेटा) विद्यापीठाच्या डेटाबेसमधून वर्गीकृत करण्यात येत असून ह्या संदर्भातील कार्यप्रणाली निश्चित करण्याचे काम सुरू आहे.

तसेच याअंतर्गत समाविष्ट सर्व विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज स्वतंत्रपणे सुरू करण्यात येणार असून ह्याबाबतही विद्यार्थ्यांनी साशंक अथवा भयभीत होऊ नये.

ह्या अंतर्गत पात्र विद्यार्थ्यांची शैक्षणिक वर्ष २०२५—२६ मधील सत्रपूर्तता, शेवटचे वर्ष त्यांच्या मूळ महाविद्यालयातून पूर्ण करण्याची आवश्यकता, विविध अभ्यासक्रमात वेळोवेळी समाविष्ट झालेला मूळ कालावधी या सर्वांची छाननीही होणार असून ह्याबाबतची प्रणालीही तयार करण्याचे काम सुरू आहे.

ह्या अनुषंगाने या संदर्भात सर्व संबंधितांना कळविण्यात येत आहे की, सत्रपूर्ततेचा नियत कालावधी आणि अंतर्गत मूल्यमापनाबाबतची खात्री करूनच अशा सर्व विद्यार्थ्यांची परीक्षा ही स्वतंत्रपणे वेळापत्रक जाहीर करून आयोजित करण्यात येईल आणि या संदर्भातील कार्यप्रणाली स्पष्ट करणारे परिपत्रकही यथावकाश जाहीर करण्यात येईल.

या सर्व पार्श्वभूमीवर सर्व विद्यार्थी, पालक यांना निर्देशित करण्यात येत आहे की, उपरोक्त बाबींसंदर्भात आपण आपल्या मूळ महाविद्यालयाच्या/परिसंस्थेच्या मा. प्राचार्य/मा. संचालक आणि परीक्षा अधिकारी यांच्याच संपर्कात राहावे. शिवाय विद्यापीठाच्या अधिकृत परिपत्रकाशिवाय इतर अफवा अथवा माहिती यांना अजिबात बळी पडू नये. सत्रपूर्तता किंवा PRN संदर्भातील सर्व माहिती ही केवळ विद्यापीठाकडे असलेल्या स्वतःच्या डेटाबेसमधूनच घेतली जाणार असून यासाठी विद्यापीठाने कोणत्याही व्यक्तीला/व्यक्तीसमूहांना अधिकृत/प्राधिकृत केलेले नाही, याचीही नोंद घ्यावी.

(प्रा. डॉ. प्रभाकर देसाई)
प्रभारी संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

जा. क्र. परीक्षा/एस ॲण्ड टी/१७४२

दिनांक : ०७ नोव्हेंबर, २०२५

**प्रत माहितीसाठी :**

१. मा. कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
२. मा. प्र-कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
३. मा प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था, प्रस्तुत विद्यापीठ
४. सहायक कुलसचिव, जनसंपर्क कार्यालय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे



Scanned with OKEN Scanner